MHAU030107462021

**पी.डब्लू.डी.व्ही.ए.क्रं.४५९/२०२१ मधील निशाणी क्र.०५ – क  खालील आदेश**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, (येथुन पुढे संक्षिप्त संबोधन 'अधिनियम २००५') चे २३ अन्वये गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार क्र. १ यांचे थोडक्यात कथन आहे की, अर्जदार क्र. १ हिचा विवाह गैरअर्जदार क्र. १ सोबत दिनांक १३.०५.२०१२ रोजी झालेला आहे. अर्जदार हिच्या वडिलांनी एक एकर जमीनीपैकी १० गुंठे विक्री करुन सदर लग्नामध्ये सात ते आठ लाख रुपय खर्च केले. उभयतांचे पती–पत्नीचे नातेसंबंध आजही कायम आहेत.

३. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारांकडे नांदावयास गेली असता, तिच्या सासरी गैरअर्जदार क्र. १ ते ७ हे एकत्र कुटूंबात राहत होते. लग्नानंतर अर्जदार यांनी अर्जदार हिला सुमारे दोन ते तीन वर्ष चांगले वागवले व त्यानंतर अर्जदार हिला शारिरीक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात करुन तिला मारहाण करीत असे. अर्जदाराला दोन्ही मुली झाल्या त्यामुळे गैरअर्जदार हे तिला त्रास देत असे. तसेच दुसऱ्या बाळंतपणाचा सर्व खर्च अर्जदार हिचे आईवडीलांनी केला. गैरअर्जदार हे गैरअर्जदारक्रमांक १ चे दुसरे लावून देण्याचे बोलू लागले. गैरअर्जदार क्र. १ हा इतर गैरअर्जदारांच्या सांगण्यावरून अर्जदार क्रमांक १ हिला रात्री बेरात्री मारहाण करुन घरातुन हाकलुन देत असे. गैरअर्जदार क्र. १ याचे एका महिलेशी अनैतिक संबंध होते ती देखील अर्जदार हिला रात्री बेरात्री फोन करुन अर्जदार हिला शिवीगाळ करीत असे. अर्जदार हिला तिसरी मुलगी झाली या कारणावरुन गैरअर्जदार हे अर्जदार हिला तु

करंटी आहेस आम्हाला वंशाचा दिवा पाहिजे होता असे म्हणुन अर्जदार हिला रात्री बेरात्री शिवीगाळ करुन मारहाण करीत असे व शारीरिक व मानसिक त्रास देत असे. त्यानंतर गैरअर्जदार यांनी दिनांक २०.०७.२०१९ रोजी अर्जदारास मारहाण केली व तिच्या भावाला बोलावले. अर्जदार व लहान मुलगी प्रगती हीस माहेरी पाठवुन दिले. तसेच अर्जदाराच्या मोठया दोन मुली स्वतःजवळ ठेवुन घेतल्या. अर्जदार ही नाईलाजास्तव माहेरी राहत आहे. असे की, गैरअर्जदार क्र. १ च्या नावावर शेती आहे त्यातुन त्याला दरवर्षी १० ते १५ लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा दैनिक सकाळ चा पत्रकार असुन त्यास दरमहा १० हजार व काटे पिंपळगाव ग्रामपंचायत मार्फत सेतु सुविधा केंद्र यापासुन १५ ते २० हजार रुपये उत्पन्न् मिळते. तसेच त्याचे काटे पिंपळगाव येथे मोबाईल शॉपी दुरुस्ती व मोबाईल विक्री चे दुकान असुन त्यामध्ये झेरॉक्स डिटीपी सेंटर चालवतो, त्यापासुन त्याला दरमहा ४० ते ५० हजार उत्पन्न मिळते. अर्जदार स्वतःची व मुलीची उपजिविका भागविण्यास असमर्थ आहे त्यामुळे अर्जदार क्र.१ हिस दरमहा १५,०००/– व अर्जदार क्र. ४ हिस दरमहा रुपये ५०००/– इतकी अंतरिम पोटगी गैरअर्जदारांनी देण्याची विनंती केली आहे तसेच दोन खोल्यांचे निवासी घर अर्जदारास राहण्याकरिता द्यावे किंवा रुपये ८०००/– दरमहा भाडे द्यावे. तसेच गैरअर्जदारांनी गैरअर्जदार क्र. १ व २ च्या नावे असलेली गट क्र. ३३० मधील जमीन व राहते घर, गावातील प्लॅाट/दुकान गहाण, विक्री, तारण करु नये यासाठी प्रतिबंधात्मक आदेश द्यावा अशी विनंती केली आहे.

४. गैरअर्जदार क्र. १ ते ७ यांनी निशाणी क्र. ८ प्रमाणे त्यांचे म्हणणे दाखल करुन गैरअर्जदार क्र. १ चे अर्जदार क्र. १ ते ४ सोबतचे संबंध मान्य केले आहे. त्याशिवाय अर्जदार क्र. १ ने लावलेले सर्व आरोप गैरअर्जदारांनी पुर्णपणे फेटाळले आहेत. गैरअर्जदार यांनी असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. ४ ते ७ यांचे लग्न खुप पुर्वी झाले असुन त्या माहेरी आईवडिलांना भेटण्यासाठी गेलेल्या नाहीत व अर्जदार क्र. १ हिस त्यांनी कधीही त्रास दिलेला नाही. अर्जदार क्र. १ हि भांडखोर असुन ती

घरामध्ये नेहमी कलह करीत असे. ती मनात येईल तेव्हा माहेरी जाऊन दोन दोन महिने माहेरी राहत असे. गैरअर्जदार क्र. १ याने अनेकवेळा नातेवाईकांच्या मध्यस्तीने तिला नांदवण्यासाठी आणले आहे. अर्जदार क्र. २ व ३ या सध्या गैरअर्जदार क्र. १ याचेकडे राहत आहे. अर्जदार ही स्वतःहुन अनेक वेळा घर सोडुन माहेरी निघुन गेलेली आहे. गैरअर्जदार क्र. ७ हिने गंगापुर येथे गैरअर्जदार क्र. १ ते ६ यांच्याविरुध्द वाटणीचा दावा दाखल केला होता, तो दावा मंजुर झाला व गैरअर्जदार क्र. १ च्या वाट्यास ३० आर जमीन आली. परंतु सदरील जमीनीची मशागत गैरअर्जदार क्र. ४ ते ७ हे करतात व ती त्यांच्याच ताब्यात आहे. त्या जमीनीपासुन गैरअर्जदार क्र. १ यास कोणतेही उत्पन्न नाही. अर्जदारास २०२२ मध्ये नांदण्यासाठी आणले होते, परंतु अर्जदार ही भांडण करुन परत माहेरी निघुन गेली. गैरअर्जदार क्र. १ हा ग्रामपंचायतमध्ये ग्रामरोजगार सेवक म्हणुन काम करीत आहे व त्यास ३,०००/– ते ३५००/– रुपये प्रतिमहिना मानधन मिळते. तसेच गैरअर्जदार क्र. २ हे वयस्कर असुन त्यांचा औषधउपचाराचा खर्च गैअर्जदार क्र. १ यांना कारावा लागतो. तसेच गैरअर्जदार क्र. ३ यांचे डोळयांचे ऑपरेशन झाले असुन त्यांची दृष्टी कमकुवत आहे. गैरअर्जदार क्र. १ हा एकुलता एक मुलगा या नात्याने गैरअर्जदार क्र. २ व ३ यांची सर्वस्वत जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ यांच्यावर आहे. याउलट अर्जदार क्र. १ ही शारिरीक दृष्टया मजबुत असुन माहेरी मजुरी काम करुन प्रतिदिन ४५०/– ते ५००/– रुपयाचे रोज काम करते. त्यामुळे अर्जदार हि तिचा स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. तसेच अर्जदार यांनी केलेले आरोप हे काल्पनीक असुन अर्जदार ही पिडीत महिला नसल्याने सदरील प्रकरण दाखल करण्याचा त्यांना कोणताही अधिकार नसल्याचे कथन केले. अर्जदार क्र. २ व ३ या गैरअर्जदार क्र. १ कडे आहे. अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. उभयपक्षांची कथने विचारात घेता व युक्तीवाद ऐकता, प्रस्तुत अंतरीम पोटगीच्या अर्जाच्या निर्णयाकरीता पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले आहेत. त्यावरील निर्णय/निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ हीने ती गैरअर्जदाराच्या घरगुती हिंसाचारामुळे पिडीत / व्यथीत असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत केले आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार हे गैरअर्जदाराकडुन मुळ अर्जाचा निकाल लागेपावेतो अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र / हक्कदार आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ३. | अर्जदार हिस राहण्यासाठी स्वतंत्र दोन खोल्या देण्याचा किंवा दरमहा रुपये ८ हजार भाडे म्हणून देण्याचा आदेश होऊन मिळणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. | गैरअर्जदारांनी वडीलोपार्जीत मिळकत, शेतजमिन, घर, प्लॉट, दुकानाचे कोणतेही अधिकार हस्तांतरीत करू नये असा आदेश होऊन मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | नकारार्थी |
| ५. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## <u>कारणेमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र.१ साठी</u>

६. अर्जदार क्र.१ हिने कौटूंबिक हिंसाचाराबाबत गैरअर्जदारांविरुध्द जे आरोप केले आहेत त्याच्या पुष्टयर्थ निशाणी १ च्या कथनांना दुजोरा देण्यासाठी शपथपत्र दिले आहे. थोडक्यात अर्जदार क्र. १ हिच्या विधानांना शपथपत्राव्दारे पुष्टी मिळते. गैरअर्जदाराने अर्जदाराचा कौटूंबिक हिंसाचाराबाबतचा संपूर्ण मजकुर नाकारलेला

असला तरी उभय पक्षांमधील संबंध तणावाचे असल्याचे व त्यातुन त्यांनी एकमेकांविरुध्द न्यायालयात आरोप केल्याचे दिसून येते. उभयपक्षांच्या कथनांवरुन असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. ४ सह गैरअर्जदार यांच्यापासुन वेगळी म्हणजेच तिच्या माहेरी राहत आहे. तेव्हापासून गैरअर्जदार क्र. १ याने त्यांच्या अन्नवस्त्राची कोणतीही काळजी घेतलेली नाही. अर्जदार क्रमांक १ व ४ यांना जिवनावश्यक वस्तुंसाठी तिच्या माहेरच्या लोकांवर अवलंबून राहावे लागते. अधिनियम २००५ कलम ३ प्रमाणे पत्नीस निवारा, तसेच जीवनाश्यक वस्तू पुरविणे हे पतीचे कर्तव्य आहे. सदर कर्तव्यामध्ये कसूर करणे, तसेच अर्जदार हीस ती हकदार असलेल्या संसाधनांची किंवा सुविधांचा वापर करण्यास मज्ञाव करणे हे महिलेवर आर्थिक पिळवणुक करणे या कौटूंबीक हिंसाचार करण्याच्या संज्ञेमध्ये बसते. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हीस मारहाण करतो. अर्जदाराने अभिलेखावर पोलीस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांच्याकडे केलेला दिनांक १९/१२/२०२० रोजीचा तक्रार अर्ज दाखल केला आहे. तसेच अर्जदाराने गैरअर्जदारांविरूध्द दिलेला गु.र.क्रमांक ५८/२०२१ हा देखील अभिलेखावर दाखल केला आहे. यावरून प्रथमदर्शनी असे दिसते की, अर्जदार हिने प्रकरण दाखल करण्यापुर्वी देखील अनेक वेळा गैरअर्जदारांच्या विरूध्द त्रास देतात म्हणून तक्रारी दाखल केल्या होत्या. सबब अर्जदार क्र.१ ही अधिनियम २००५ च्या कलम २ प्रमाणे पीडीत महिला असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकाराथी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ साठी</u>**

७. गैरअर्जदाराने अभिलेखावर दिनांक २३/१२/२०२२ रोजीचा ग्रामपंचायत काटे पिंपळगांव यांनी त्यांना दिलेल्या मानधन पत्राची माहिती देणारा दस्त दाखल केला आहे. सदर दस्तावरून असे दिसून येते की, गैरअर्जदार क्रमांक १ यास

१८ महिण्याच्या कालावधीमध्ये रु.१,२७,४३५/– मिळाली होती. त्यावरून त्याचे ग्रामपंचायत येथील उत्पन्न हे साधारण दरमहा रु. ७०५५/– असे निघते. गैरअर्जदार क्र. १ त्याचे मत्ता व दायित्वचे प्रतिज्ञापत्र नि.१६/क वर दाखल केले आहे. त्यामध्ये त्याने त्याच्यावर अवलंबून असलेल्या आई–वडीलांचा खर्च प्रतिमहा रु. ६ ते ७ हजार दाखविला आहे. तसेच त्याच्यावर अवलंबून असलेल्या मुलींचा खर्च रु. ४ ते ५ हजार दाखविला आहे. तसेच त्याचे उत्पन्न ग्रामरोजगार सेवक म्हणुन महिण्याला ६ हजार रुपये व ३० गुंठे पडीत जमिनीमध्ये वाटा दाखविला आहे. महिना ६ हजार कमावित असतांना गैरअर्जदार हा त्याच्या घरच्यांवर ६ व ५ हजार असे ११ हजार रुपये खर्च कसा करतो याचा तपशील दिलेला नाही.

८. अर्जदाराने अभिलेखावर गैरअर्जदार याचे नावे असलेले गट क्रमांक ३२८ काटे पिंपळगांवचा ७/१२ उतारा दाखल केला आहे त्यामध्ये गैरअर्जदार क्रमांक १ च्या नावावर ८२ आर जमिन असल्याचे दिसते. यावरून असे दिसते की, सदर जमिन ही पडीत क्षेत्र किंवा पोटखराबा असे ७/१२ वर नमुद केलेले नाही. यावरून असे दिसते की, गैरअर्जदार क्रमांक १ हा ग्रामरोजगार सेवक योजनेमधून तसेच शेतीतून देखील उत्पन्न घेतो. गैरअर्जदार क्रमांक १ याने अभिलेखावर अर्जदार क्रमांक १ हिने दाखल केलेल्या कलम ४९८–अ प्रमाणेच्या प्रकरणामध्ये उलटतपासाची प्रमाणीत प्रत न्यायालयामध्ये दाखल केली आहे. त्यामध्ये अर्जदार क्रमांक १ हिने मान्य केले आहे की, ती सासरी असताना शेतात कामावर जात होती. तसेच एरवी शेतामध्ये रोजंदारीला २००/– ते ३००/– रुपये रोज मिळतो. यावरून असे दिसून येते की, अर्जदार क्रमांक १ हिस शेतीची कामे येतात व ती पुर्वी रोजगार कमावित होती व आज देखील त्याप्रमाणे रोजगार कमाविण्यास सक्षम आहे. जरी अर्जदार क्रमांक १ ही कमाविण्यास सक्षम असली तरी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे तिला पतीकडून त्याच्या राहणीमानानुसार खावटी मिळण्याचा अधिकार आहे. जरी गैरअर्जदार क्रमांक १ याने

कथन केले आहे की, गैरअर्जदार क्रमांक २ व ३ हे त्याच्यावर विसंबून आहे, अर्जदार क्रमांक १ हिने अभिलेखावर गट क्रमांक ३३० चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यावरून प्रथमदर्शनी असे दिसते की, गैरअर्जदार क्रमांक २ च्या नावावर १ हे. ३२ आर शेती आहे व ते क्षेत्र मिश्र पिकांखालील क्षेत्र आहे. यावरून असे दिसते की, गैरअर्जदार क्रमांक २ हा शेतीतून उत्पन्न घेतो व तो गैरअर्जदार क्रमांक १ वर पैशांसाठी अवलंबून नाही. यावरून असे दिसते की, गैरअर्जदार क्रमांक १ वर त्याच्या दुसऱ्या दोन मुलींची जबाबदारी आहे. परंतू त्यामुळे तो अर्जदार क्रमांक १ व ४ यांच्या कडे असलेली जबाबदारी झटकू शकत नाही. अर्जदार क्रमांक १ हिने गैरअर्जदार क्रमांक १ हा मोबाईलचे दुकान चालवितो व इतर व्यवसाय देखील करतो तथापी, त्याबाबत तिने अभिलेखावर काहीही दाखल केला नाही. सबब, अर्जदारांचे राहणीमान, मुलभुत गरजा गैरअर्जदार क्र १ चे प्रथमदर्शनी उत्पन्न इतर जबाबदारी लक्षात घेता अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु.२५००/– व अर्जदार क्र. ४ यांना प्रत्येकी दरमहा रु.१५००/– अंतरिम पोटगी देणे योग्य होईल. सबब मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.३ साठी</u>

९. अर्जदाराने तिला घरभाडे करीता रक्कम रुपये ८०००/– ची गैरअर्जदार क्र.१ कडुन मागणी केलेली आहे. अर्जदाराने तिच्या शपथपत्रामध्ये नमुद केले आहे की, ती रघुनाथ कळंमकर यांचया पत्यावर बजाजनगर, वडगांव कोल्हाटी येथे राहते परंतू ती तेथे किरायाने राहते किंवा कसे याबाबत काहीच नमुद केले नाही. तसेच तिने अभिलेखावर रहिवासी दाखला हा बजाजनगर येथील दाखल केला आहे. परंतू तिने अर्जामध्ये फक्त नमुद केले आहे की, औरंगाबाद येथे राहण्यास घर नाही, त्यामुळे तिला घर घेवून द्यावे. तसेच घरात किरायाने राहत आहे याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही अथवा ती राहत असलेल्या किरायाच्या घरातील भाडे पावत्या अभिलेखावर दाखल केलेल्या नाही. सबब, अर्जदाराची घरभाड्याची मागणी मंजुर करता येणार नाही. सबब मुद्दा क्र. ३ चा निष्कष नकारार्थी नोदंवित आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करीता–**

१०. अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जामध्ये गैरअर्जदारांनी शेतजमिनी, राहते घर, गावातील प्लॉट, दुकाने इत्यादी कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करू नये अशी तात्पुरती मागणी केली आहे. अर्जदाराने अभिलेखावर गट क्रमांक ३३० चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यावरून प्रथमदर्शनी असे दिसते की, गैरअर्जदार क्रमांक २ च्या नावावर १ हे. ३२ आर शेती आहे– गट क्रमांक ३२८ काटे पिंपळगांवचा ७/१२ उतारा दाखल केला आहे त्यामध्ये गैरअर्जदार क्रमांक १ च्या नावावर ८२ आर जमिन असल्याचे दिसते. महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम १८ (ई) प्रमाणे न्यायालय हे गैरअर्जदारांस कोणतीही चल किंवा अचल संपत्ती ज्यामध्ये अर्जदाराचे हितसंबंध आहे असे विकण्यास किंवा हस्तांतरीत करण्यास मज्ञाव करू शकते.

***Maharaj Kumari Vishnupriya vs State Of U.P. And 2 Others on 20 May, 2024,***

मा. उच्च न्यायालय, अलाहाबाद हे या निष्कर्षास पोहोचले आहे की,

*“(vi) The alienation of assets whether moveable or immoveable in which the aggrieved person has an interest or is entitled to use by virtue of the domestic relationship or which may be reasonably required by the aggrieved person or her children or her 'stridhan' or any of the other properties jointly or separately held by the aggrieved person, may constitute 'economic abuse' bringing it within the definition of "domestic violence" under Section 3 of the DV Act.*
*(vii) Adjudication of title of an aggrieved person with regard to moveable or immoveable properties sought to be alienated cannot be made under the DV Act but can only be made by a competent civil court. However, in respect of such properties a protection order can be passed by the Magistrate under Section 18 of the DV Act on his prima facie satisfaction that domestic violence has taken place or is likely to take place”*

११. सबब, सदर न्यायालय हे मिळकती संदर्भात संरक्षण आदेश देवू शकते, परंतू मिळकती संदर्भात मालकी हक्क निश्चीत करणे हे दिवाणी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येते. अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यांवरून असे लक्षात येते की, सदर मिळकती ह्या अर्जदार क्रमांक १ व २ च्या नावे आहेत परंतू सदर मिळकती ह्या त्यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहे किंवा वडिलोपार्जित मिळकती आहे या संदर्भात खुलासा करणारे कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच गैरअर्जदाराने त्याच्या जबाबामध्ये नमुद केले आहे की, गैरअर्जदार क्रमांक ७ हिने वाटपाचा दावा दाखल केला होता व त्यानुसार त्याच्या नावे वाटपाने ३० आर जमिन आली आहे. परंतू ते कोणत्या जमिनी संदर्भात आहे हे त्याच्या जबाबामध्ये स्पष्ट होत नाही. तसेच अर्जदाराने ७/१२ उतारे हे सन २०२१ व २०२३ चे दाखल केले आहेत त्यामुळे त्यावरून सदर जमिनीच्या मालकीची सद्य परिस्थीती माहित नसतांना त्याबाबत अंतरीम आदेश करणे हे संपुर्ण पुरावा घेतल्याखेरीज न्यायोचित ठरणार नाही. सबब, मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ साठी</u>**

१२. सबब मुद्दा क्र. १ ते ४ यांच्या वरील चर्चा केल्याप्रमाणे मुद्दा क्र.५ साठी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला दरमहा रक्कम रुपये २५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) तसेच अर्जदार क्र. ४ हिला रक्कम रुपये १५००/- (अक्षरी रुपये एक हजार पाचशे मात्र) अंतरीम पोटगी सदर अर्ज दाखल केलेल्या तारखेपासुन मुळ अर्जाचा निकाल होईपावेतो अथवा

पुढील आदेशापर्यंत दयावी.

सदर आदेशाची प्रत उभय पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by SHWETA SUBHASH GHODKE
Date: 2024.11.29 15:16:03 +0530

दिनांकः २६.११.२०२४ **(श्रीमती एस. एस. घोडके)**

औरंगाबाद. २२ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

औरंगाबाद.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | गोरखनाथ कुसन जाधव, |
| न्यायालयाचे नाव | : | न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्र.२२), औरंगाबाद. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | २६.११.२०२४ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | २९.११.२०२४ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | २९.११.२०२४ |